# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.04.2026** **वारः बुधवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर
2. नारीशक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांना पाठिंबा देण्यासाठी स्थानिक खासदारांना पत्र लिहिण्याचं पंतप्रधानांचं महिलांना आवाहन
3. बिहारचे नवे मुख्यमंत्री म्हणून भाजपाचे सम्राट चौधरी आज शपथ घेणार
4. पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला
5. पश्चिम आशियातील सद्यस्थितीबाबत पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात दूरध्वनीवरून चर्चा आणि
6. छत्तीसगडमध्ये वेदांत कंपनीच्या वीज प्रकल्पात स्फोट होऊन 13 कामगारांचा मृत्यू, 30 पेक्षा जास्त कामगार जखमी

**<u>राष्ट्रपती दौरा-नागपूर</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. नागपूरच्या एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या दुसऱ्या दीक्षान्त समारंभात त्या आज प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी इथं भारतीय महसूल सेवेच्या 78 व्या तुकडीच्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या समारोप सोहळ्यालाही त्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहतील. उद्या राष्ट्रपती वर्धा इथल्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यालयाच्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार असून, त्यानंतर त्या सेवाग्राम मधल्या गांधी आश्रमाला भेट देतील.

दरम्यान, राष्ट्रीय सुरक्षेसाठी तंत्रज्ञानस्नेही आणि कुशल मनुष्यबळाची गरज असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल गांधीनगर मध्ये बोलताना केलं. गुजरातमधे गांधीनगर इथं राष्ट्रीय रक्षा विद्यापीठाचा दीक्षांत समारंभात काल त्यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना देशासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल राष्ट्रपतींच्या हस्ते मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.

**<u>पंतप्रधान महिला आरक्षण</u>**

धोरण निर्मिती आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत महिलांच्या सक्रिय सहभागामुळे विकसित भारताच्या दिशेनं होणारी देशाची वाटचाल आणखी मजबूत होईल असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. देशातल्या नारी शक्तीला उद्देशून त्यांनी एक पत्र समाजमाध्यमांवर प्रसारित केलं आहे. त्यामध्ये देशातल्या सर्व महिलांनी स्थानिक खासदारांना पत्र लिहून नारीशक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांना पाठिंबा देण्यासाठी प्रोत्साहित करावं असं आवाहन मोदी यांनी केलं आहे.

संसदेत उद्यापासून यासंदर्भात चर्चा सुरू होणार असून, 2029 च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांपासून देशात महिला आरक्षण लागू करण्यासाठी, या सुधारणा मंजूर होण्याची गरज आहे, असं त्यांनी या पत्रात नमूद केलं आहे. विकसित भारताच्या निर्माणात योगदानाची एक अभिनव संधी मिळाल्यामुळे देशातल्या महिलांनी आनंद व्यक्त केला असून, ज्यावेळी देशाच्या विधानसभेत महिलांचा आवाज सबळ होतो तेव्हा संविधान प्रक्रियेत लोकशाहीचा आवाजही प्रभावी होतो असंही पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

दरम्यान, नारी शक्ती वंदन विधेयकाला सर्व पक्षांनी पाठिंबा द्यावा, असं आवाहन राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केलं. या विधेयकाद्वारे महिलांना राजकीय प्रतिनिधित्व मिळणार असल्याचं कुलकर्णी यांनी सांगितलं.

पंतप्रधानकर्नाटकपूल

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज कर्नाटक मधल्या मंड्या गावातील श्रीक्षेत्र आदींचुनचनगिरी मठात श्री गुरु भैरवैक्य मंदिराचं उद्घाटन करणार आहेत. सुरुवातीला पंतप्रधान ज्वाला पीठाला भेट देणार आहेत. नवीन मंदिराचे उद्घाटन करण्यापूर्वी ते काल भैरव मंदिरात प्रार्थना करतील.
त्यानंतर ते मठाच्या आध्यात्मिक परंपरेला सन्मान देण्यासाठी उभारलेल्या नव्या मंदिराचं उद्घाटन करतील.

**शपथ विधी**

बिहारचे नवे मुख्यमंत्री म्हणून भारतीय जनता पार्टीचे नेते सम्राट चौधरी आज शपथ घेणार आहेत. पाटण्यामध्ये लोकभवन इथं सकाळी 11 वाजता राज्यपाल सय्यद अता हसनैन त्यांना पदाची शपथ देतील. भाजपाच्या विधीमंडळ नेतेपदी चौधरी यांची एकमतानं निवड झाल्यानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विधीमंडळ नेतेपदीही त्यांची निवड झाली. त्यानंतर त्यांनी राज्यपालांकडे जाऊन सरकार स्थापनेचा दावा केला.
ही जबाबदारी म्हणजे लोकसेवेची एक पवित्र संधी असून, बिहारच्या जनतेसाठी समर्पितपणे काम करण्याचं आश्वासन सम्राट चौधरी यांनी समाज माध्यमावरील एक संदेशात दिलं.

दरम्यान, ज्येष्ठ नेते नितीश कुमार यांनी काल मंत्रीमंडळ बरखास्त करून बिहारच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा राज्यपालांकडे सुपूर्द केला. ते आता राज्यसभेचे सदस्य आहेत. नव्या सरकारला आपलं मार्गदर्शन आणि पाठिंबा कायम राहील, असं त्यांनी सांगितलं.

**निवडणूक प्रचार**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये प्रचार शिगेला पोहोचला आहे. भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल पक्षाच्या पश्चिम बंगालमधल्या कार्यकर्त्यांशी नमो ॲपद्वारे संवाद साधला. भाजपाच्या जाहिरनाम्याला पश्चिम बंगालमधल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात पसंती दिली असून, राज्यातले, सर्व स्तरातले नागरिक भाजपाच्या कार्यक्रमात सहभागी होत असल्याचं मोदी यावेळी म्हणाले. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृह मंत्री अमित शाह आज राज्यात दार्जिलिंग, जलपायगुड़ी आणि कूचबिहारमध्ये प्रचारसभा घेणार आहेत.

तामिळनाडू मध्ये भाजपा नेते आणि केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी काल पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. राज्याच्या विकास आणि प्रगतीसाठी एनडीएला सत्तेत येणं आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं. डीएमके प्रमुख आणि तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी वेल्लोर मध्ये काल प्रचारसभा घेतली तर अखिल भारतीय अण्णा द्रमुक पक्षाचे महासचिव इ पलानीसामी यांनी काल तिरुचिरापल्ली मध्ये प्रचारसभा घेतली.

**आंबेडकर-जयंती**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती काल देशभरात उत्साहात साजरी झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुजरातमधल्या गांधीनगरमध्ये लोकभवन इथं असलेल्या बाबासाहेबांच्या छायाचित्राला पुष्पांजली अर्पण केली. उपराष्ट्रपती सी.पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री आणि खासदारांनी संसद परिसरातल्या प्रेरणास्थळ इथं बाबासाहेबांच्या पुतळ्याला आदरांजली वाहिली.
मुंबईसह राज्यात सर्वत्र डॉ आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं. राज्याच्या विविध भागातून अनुयायी काल चैत्यभूमीवर दाखल झाले होते. चैत्यभूमीवर शासकीय मानवंदना देण्यात आली. महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह इतर मान्यवरांनी बाबासाहेबांना अभिवादन केलं.

नागपूरच्या ऐतिहासिक दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि अखिल भारतीय धम्मसेना यांनी संयुक्तपणे डॉक्टर आंबेडकर यांना अभिवादन कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. यावेळी भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या उपस्थितीत बुद्ध वंदना घेण्यात आली. त्यानंतर तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पमाला अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रत्नागिरी जिल्ह्यातल्या आंबडवे या मूळ गावी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या वतीनं डॉ आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.

**<u>पंतप्रधान</u>**

पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यामध्ये काल दूरध्वनीवरून चर्चा झाली. पंतप्रधान मोदी यांनी समाज मध्यमावर याबाबत माहिती दिली आहे. पश्चिम आशियातील सध्याची परिस्थितीवर आणि प्रामुख्याने होर्मुझची सामुद्रधुनी खुली आणि सुरक्षित ठेवण्याच्या मुद्दयावर यावेळी भर देण्यात आल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

दरम्यान पश्चिम आशियातील वाढता तणाव कमी करण्यासाठी राजनैतिक पातळीवर प्रयत्न सुरू असल्याचं चित्र आहे. इराणबरोबरची चर्चा येत्या काही दिवसांत पुन्हा सुरू होऊ शकते, असे संकेत अमेरिकेने दिले आहेत. तर दुसरीकडे इस्रायल आणि लेबनॉनने अनेक वर्षांनंतर प्रथमच थेट वाटाघाटी सुरू केल्या आहेत.

अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो आणि अमेरिकेतील इस्रायल आणि लेबनॉनचे राजदूत यांच्यात वॉशिंग्टन इथ नुकतीच ही बैठक झाली.

**<u>वेदांता स्फोट</u>**

छत्तीसगढ मधल्या सिंगेतराई गावात वेदांत कंपनीच्या वीज प्रकल्पात काल स्फोट होऊन 13 कामगारांचा मृत्यू झाला तर 21 जण जखमी झाले असल्याची माहिती छत्तीसगढ पोलिसांनी दिली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, मदत आणि बचाव कार्य सुरु आहे. या दुर्घटनेबद्दल छत्तीसगढचे मुख्यमंत्री विष्णू देव साई यांनी या दुःख व्यक्त केलं असून, मृत कामगारांच्या कुटुंबियांना 5 लाख रुपये आणि जखमींना 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. साई यांनी बिलासपूर विभागाच्या आयुक्तांना या दुर्घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. तपासात दोषी आढळलेल्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितले.

**<u>फिडे बुद्धिबळ</u>**

उझबेकिस्तानच्या जावोखीर सिंदारोव्हनं काल नेदरलँड्सच्या अनिश गिरीवर मात करता फिडे बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत आता त्याचा सामना विश्वविजेता भारतीय बुद्धिबळ ग्रँडमास्टर डी. गुकेश याच्याशी होणार आहे. विश्वविजेते पदासाठीचा हा सामना या वर्षाच्या अखेरीस होणार आहे. दोन्ही खेळाडू 20 वर्षांचे आहेत; त्यामुळे फिडे बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम फेरीत सर्वात तरुण खेळाडूंमध्ये सामना रंगणार आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार ..